**बेवारटोला लघु पाटबंधारे योजना ता. सालेकसा जि. गोंदिया या योजनेस तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रदान करण्याबाबत.**

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ , नागपूर**

महामंडळाचा निर्णय क्र. ८२ /विपाविमं/कातां.२/बेवारटोला ल. पा. प्रकल्प/तृतीय सुप्रमा/(धा.क्र.१२/१८), दिनांक ८/३/२०१९

**पहावे :** महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/(३५/२०१५)/जसं(अ), मंत्रालय, मुंबई, दिनांक ९ सप्टेंबर २०१५

बेवारटोला लघु पाटबंधारे योजना, ता. सालेकसा जि. गोंदिया या योजनेस शासन निर्णय क्र. लपात २३९५/(३६४/९५)/लपा-२ मंत्रालय मुंबई दिनांक ०१.०१.१९९६ अन्वये अंदाजित खर्च रु. ८.८० कोटी (दरसूची १९९५-९६ वर आधारित) मुळ प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

तदनंतर शासन निर्णय क्रमांक लपात २३०२/(४४६/०२)/लपा-२ मंत्रालय मुंबई दिनांक २०.०४.२००४ अन्वये रु. २७.२७ कोटी (दरसुची २०००-०१ वर आधारित) प्रथम सुधारित प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली होती.

तदनंतर शासन निर्णय क्रमांक प्रकल्प २३१२/(२७४/२०१२)/लपा-२ मंत्रालय मुंबई दिनांक ०५.०२.२०१५ अन्वये रु. ६९.७६ कोटी (दरसूची २००७-०८ वर आधारित) द्वितीय सुधारित प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली. बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ भुसंपादन खर्चातील वाढ, संकल्पातील बदल इतर कारणे व अनुषंगिक खर्चातील वाढ इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत द्वितीय सुधारीत प्रशासकिय मान्यता किंमतीच्या १०% हून अधिक वाढत असल्याने योजनेस पुन्हा सुधारित प्रशासकिय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :-**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये बेवारटोला लघु पाटबंधारे प्रकल्प, ता. सालेकसा, जि. गोंदिया या योजनेच्या एकूण अंदाजित किंमत रु. ८९६५.३२ लक्ष (रु. एकोणनव्वद कोटी पासष्ठ लक्ष बत्तीस हजार फक्त) खर्चास तृतीय सुधारित प्रशासकिय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रु. ८५८१.४९ लक्ष (पंच्याशी कोटी ऐक्यांशी लक्ष एकोणपणास हजार फक्त) कामाप्रित्यर्थ व रु. ३८३.८३ लक्ष (तीन कोटी त्र्याहन्शी लक्ष त्रयाहन्शी हजार फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरित कामासाठी सन २०१७-१८ या वर्षाच्या दरसूची प्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशीर्ष वार तरतूदीचा गोषवारा परिशिष्ट १ मध्ये सलग्न आहे.

**ठळक बाबी :-**

| | | |
|---|---|---|
| अ) योजनेचा एकुण पाणीसाठा | : | ७.९६८८ द.ल.घमी. |
| ब) योजनेचे सिंचन क्षेत्र | : | १३४० हे. |
| क) योजनेची सिंचन क्षमता | : | १६७५ हे. |
| ड) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर | : | १.०० (मापदंड १.०० पेक्षा जास्त) |

हा निर्णय संदर्भामध्ये उल्लेखित शासन निर्णयातील परिच्छेद १.३ नुसार तसेच नियामक मंडळाच्या दिनांक १२.०२.२०१९ रोजी संपन्न ७३ व्या बैठकीत मान्य झालेल्या ठराव क्र.७३/२ चे अनुषंगाने सचिव उपसमितोने व राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासणी अहवालातील मुद्या क्र. २६ व २७ च्या पुर्ततेच्या अटीच्या अधीन राहून महामंडळास प्रदान करण्यात आलेल्य अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्रमांक ४७०२-५१०१ लघु पाटबंधारे वरील भांडवली खर्च ८०-सर्वसाधारण, १९०-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००)(०५) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०२-५१०१) या लेखाशिर्षाखाली खर्च घालावा व विदर्भ पाटंधारे विकास महामंडळाकडील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

या योजनेस प्रदान केलेली तृतीय सुधारित प्रशासकिय मान्यता (३४/२०१९) या अनुक्रमांकावर नोंदवहीत नोंदविण्यात आली आहे.

शासन निर्णय जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेत स्थळावरील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या मिनी वेब पोर्टलवर उपलब्ध करण्यात येत आहे.

विदर्भ पाटंधारे विकास महामंडळाचे अध्यक्ष यांचे आदेशानुसार व नावाने.

मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य

अधीक्षक अभियंता
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर

सोबत :- परिशिष्ट-१

प्रतिलिपी :- (सहपत्रासह)

१. स्वीय सचिव, मंत्री, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई-३२
२. प्रधान सचिव (जसंप्र व वि), जलसंपदा, मंत्रालय, मुंबई-३२
३. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा, मंत्रालय, मुंबई-३२
४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परीक्षा), नागपूर
६. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
९. मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महामंडळ कार्यालय, नागपूर
११. अधीक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर
१२. जिल्हाधिकारी, गोंदिया
१३. कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया
१४. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, गोंदिया
१५. चित्र शाखा, वि.पा.वि.म., नागपूर संग्रहार्थ.

नोट :- नियामक मंडळाचे दि. १२/०२/२०१९ च्या ७३ व्या बैठकीचे इतिवृत्त माहे ऑगस्ट २०१९ मध्ये मंजूर झालेले असल्याने या योजनेस प्रदान केलेली तृ. सु. प्र. मा. नोंदवहीत (३४/२०१९) च्या क्रमांकावर नोंदवून आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

कार्यकारी अभियंता
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ

महामंडळाचा निर्णय क्र. ६२ /विपाविमं/कातां.२/बेवारटोला ल. पा. प्रकल्प/तृतीय सुप्रमा/(धा.क्र.१२/१८), दिनांक ०८/०३/२०१९

परिशिष्ट - १

बेवारटोला लघु पाटबंधारे प्रकल्प, ता. सालेकसा, जि. गोंदिया

रु. लक्ष

| अ.क्र. | उपशिर्ष | रक्कम | | | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| | | शिर्ष कामे | मुख्य कालवा | वितरिका | |
| १. | "ऐ" प्राथमिक कामे | १०.४१ | ७.७८ | १७.९५ | ३६.१४ |
| २. | "बी" जमिन (II & III) कालवे | ३६७.७८ | ५५.३० | २२.७५ | ४४५.८३ |
| ३. | "सी" मुख्य कामे | ३५६१.९० | ०.०० | ०.०० | ३५६१.९० |
| ४. | "डी" विमोचक | ९७.४० | ६१.४३ | ११.६७ | १७०.४९ |
| ५. | "ई" प्रपात | ०.०० | २२.४६ | ०.०० | २२.४६ |
| ६. | "एफ" नाल्यावरील कामे | ०.०० | ५८७.९५ | ११.३३ | ५९९.२८ |
| ७. | "जी" पुल | ०.०० | १४४.३० | १०१.९८ | २४६.२८ |
| ८. | "एच" अतिवाहक | ०.०० | ४३.३९ | ०.०० | ४३.३९ |
| ९. | "के" इमारत | ३.७१ | ०.०० | ०.०० | ३.७१ |
| १०. | "एल" मातीकाम | ०.०० | १५९१.०७ | ५५.८३ | १६४६.९१ |
| ११. | "एम" वृक्षारोपण | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १२. | "ओ" संकीर्ण | ४७.२४ | ०.९० | ०.०० | ४८.१४ |
| १३. | "पी" देखभाल | ३७.३० | १.०३ | ०.०० | ३८.३३ |
| १४. | "क्यु" हत्यारे व सयंत्रे | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १५. | "आर" दळणवळण | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १६. | बंद नलिका वितरण प्रणाली | ०.०० | ०.०० | १७१८.६४ | १७१८.६४ |
| | एकूण कामाप्रित्यर्थ किंमत | | | | ८५८१.४९ |
| | अनुषंगिक खर्च | | | | ३८३.८३ |
| | योजनेची एकूण किंमत | ४१२५.७२ | २५९५.६२ | १९४०.१५ | ८९६५.३२ |

मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य

अधीक्षक अभियंता
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर